Literacy for a Billion

Movie: Susu Numbari Javai Dus Numbari
Year: 2008

Song: Tumchya Rationcardavarti Naav Majh Laval Ka
Lyricist: Shrirang Godbole

तुमच्या रेशनकार्डावरती
नाव माझं लावाल का?
तुमच्या रेशनकार्डावरती
नाव माझं लावाल का?
सांगा औंदाला
इश्...
तुमच्या रेशनकार्डावरती
नाव माझं लावाल का?
तुमच्या रेशनकार्डावरती
नाव माझं लावाल का?
सांगा औंदाला
टामटुम वाजवाल का
सांगा औंदाला
टामटुम वाजवाल का
टामटुम टामटुम
टामटुम टामटुम

एका नजरेत कशी झाली रूजवात
अन् जडली ही प्रीत
सोडूनिया रीतभात
हिला जवळ बोलवाल का
सांगा औंदाला
टामटुम वाजवाल का
सांगा औंदाला
टामटुम वाजवाल का?

मोठा मांडव पाहिजे
अन् रंगीबेरंगी त्याला कनात पाहिजे
मोठा मांडव पाहिजे
अन् रंगीबेरंगी त्याला कनात पाहिजे
अन् वरात पाहिजे
लोकात झोकात वस्तीत
गावात लगीन गाजवाल का?
लोकात झोकात वस्तीत
गावात लगीन गाजवाल का?
सांगा औंदाला
इश्...
एका नजरेत कशी झाली रूजवात
अन् जडली ही प्रीत
सोडूनिया रीतभात
हिचं लगीन गाजवाल का
सांगा औंदाला
टामटुम वाजवाल का
सांगा औंदाला
टामटुम वाजवाल का

ऐक माझ्या मनीचं
छान जमलं तुझं नि माझं
प्रेम राजाराणीचं
ऐक माझ्या मनीचं
छान जमलं तुझं नि माझं
प्रेम राजाराणीचं
हातात गावली हळद लावली
हां हातात गावली हळद लावली
नवरी लाजल पहा
हातात गावली हळद लावली

Literacy for a Billion

नवरी लाजल पहा
आता औंदाला
इश्...
आता औंदाला

टामटुम वाजल पहा
आता औंदाला
टामटुम वाजल पहा
आता औंदाला
टामटुम वाजल पहा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*